पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड
PUNE MAHANAGAR PARIVAHAN MAHAMANDAL LIMITED
शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे ४११ ०३७
Shankarshet Road, Swargate, Pune 411 037.
CIN No-U60210PN2007PLC130461 Website-www.pmpml.org

☎ :24440417
☎ :24440417
फॅक्स :२४४४५४९०
Fax :24445490
E-mail – tmope@pmpml.org

जावक क्र. पी.एम.पी.एम.एल./टीएम/ ८८
Ref.No. P.M.P.M.L/ TM /

दिनांक : १९/०५/२०२०
Date :

प्रति,
मे.
...............................
...............................

**विषयः- आपल्या अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची ने-आण करणेकामी पीएमपीएमएल कडील बस सुविधेबाबत.**

महोदय,

कोरानामुंळे निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीत औद्यौगिक उद्योगधंदयाना चालना देणेकामी केंद्र व राज्य शासनाने विविध अटी शर्तीवर उद्योगधंदे सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे. सद्य स्थितीत महामंडळाकडून सार्वजनिक वाहतुक व्यवस्था ही अत्यंत कमी प्रमाणात फक्त अत्यावश्यक सेवेकरीता उपलब्ध करून देत असल्यामुळे महामंडळाकडे मोठया प्रमाणात बसेस व कर्मचारी वर्ग उपलब्ध आहेत. त्या अनुषंगाने मोठया प्रमाणात कार्यरत कर्मचारी संख्या असलेल्या औद्यौगिक अस्थापनांना त्यांचे कर्मचारी ने-आण करणेकरीता महामंडळाकडून विशेष बससेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरची बससेवा ही मासिक तत्वावर रक्कम रूपये ८३.५१/- प्रति किमी व किमान २००० कि.मी. प्रतिमहा प्रमाणे उपलब्ध करून देण्यात येतील. महामंडळाकडील बसेस आवश्यक प्रचलित लॉकडाऊनचे नियमानुसार उपलंब्ध करून देण्यात येतील. याबाबत अधिक सविस्तर माहितीसाठी पीएमपीएमएल कडील श्री. अनंत वाघमारे, वाहतुक व्यवस्थापक संपर्क क्रमांक - ९८८१४९५७८२ यांचेशी संपर्क साधण्यात यावा.

सहव्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

156

P.T.O.

Scanned with CamScanner

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**
**परिवहन महामंडळामार्फत नव्याने औद्योगिक संस्था/शासकीय/निमशासकीय**
**कर्मचाऱ्यांकरीता बसेस मागणीनुसार**
**'विशेष बससेवा' सुरू करणेबाबत. अटी व शर्ती**

१) विशेष बससेवेचे संचलन कर्मचाऱ्यांकरिता सोयीस्कर व सुरक्षित होण्यासाठी देण्यात येणाऱ्या बसेस तांत्रिकदृष्ट्या सक्षम व आपल्या कार्यालयानजीकच्या डेपोच्या देण्यात येतील.

२) औद्यौगिक उद्योगधंदे/कार्यालये सुरू झालेवर ज्या मार्गावर विशेष बससेवेचे संचलन करावयाचे आहे. अशा मार्गाच्या मागणीचे स्वतंत्र पत्र अथवा ईमेल आयडीद्वारे देण्याचे करावे. ( ई मेल आयडी – tmope@pmpml.org)

३) निश्चित झालेला मार्ग संचलनाचे कि.मी. महामंडळाकडुन पडताळणी/निश्चित करून घ्यावयाचे आहेत. सन २०१९-२० मध्ये महामंडळास येणारा प्रति कि.मी. खर्च रूपये ८३.५१/- प्रति कि.मी. प्रमाणे आकारणी करण्यात. येईल अथवा प्रतिमहा किमान २००० कि.मी. व २२ दिवस कामाचे (वर्किंग डे) व त्यापुढील दिवसाकरीता जास्त होणाऱ्या कि.मी. प्रमाणे दरआकारणी करण्यात येईल. तथापी प्रतिवर्षी महामंडळाच्या (सीपीके) खर्चानुसार सदरचा दर बदलत असतो.

४) बँक गॅरंटी देणे किंवा एक महिन्याचे अगाऊ भाडे अनामत रक्कम म्हणून परिवहन महामंडळाकडे भरणे आवश्यक आहे.

५) बिलाची रकमेची आकारणी मासिक महिना प्रमाणे उदा. १ ते ३० किंवा १ ते ३१ अशाप्रमाणे करण्यात येईल.

६) वरील निश्चित केलेल्या भाडे दरानुसार होणाऱ्या कि.मी. दरानुसार महिन्याचे मासिक भाडे रक्कम होईल ती रक्कम महामंडळाकडे दरमहा सात दिवसात संबंधित औद्योगिक कंपनी/कार्यालय समन्वयाचे माध्यमातुन आरटीजीएस/धनादेशाद्वारे जमा करावयाची आहे.

७) सदर बसेसना फक्त चालक देण्यात येईल, कर्मचारी सुरक्षेची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

८) सदरची सेवा निश्चित केलेल्या रूटवर दिली जाईल.

९) प्रतिमाह भाडे रक्कम वेळेत न भरल्यास व्याजासह आकारणी व वसूली करण्यात येईल.

वरील अटी-शर्तीमध्ये महामंडळास आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहणार आहेत.



Scanned with CamScanner